- **Instrumentation अभियांत्रिकी विभागातर्फे राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती.**

**(01) ISOI STUDENT CHAPTER:-**




**डॉ. सुधीर आगाशे. शासकीय अभियांत्रिकी महाविध्यालय पुणे (१३/०२/२०१५)**

अभियांत्रिकी विध्यार्थी व बाहेरील जग जेथे विध्यार्थ्यांना आपल्या शिक्षणाचा खरा उपयोग करायचा आहे. यांच्यामधील दुवा म्हणजे एका ठराविक क्षेत्रामधील विद्यार्थ्यांची संघटना. तश्याच प्रकारे एखाद्या विध्यार्थी संघटनेचे सदस्य आमचे विध्यार्थी व्हावेत म्हणून आम्ही सर्व शिक्षकांनी मिळुन Instrument Society of India, IISc Bangalore या नामांकित संस्थेचे विध्यार्थी सदस्यत्व घेऊन मागील वर्षी ( ISOI Student Chapter) ची स्थापना केली. या विध्यार्थ्यांसाठी संघटनेच्या अंतर्गत वेगवेगळे टेक्निकल कार्यक्रमांचे आयोजन आम्ही मागील वर्षी केले होते. विध्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणा बद्दल प्रोत्साहन देण्यासाठी श्री. जे.एन.कयाल सरांचे मार्गदर्शन पर संवाद आयोजित केला होता. श्री.कयाल सर हे भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर मुंबई येथे एक नामांकित शास्त्रज्ञ आहेत.

प्रा. डॉ. शेखर गाडगीळ माजी प्राध्यापक शासकीय अभियांत्रिकी महाविध्यालय पुणे व प्रा. डॉ. सुधीर आगाशे. प्राध्यापक Instrumentation विभाग शासकीय अभियांत्रिकी महाविध्यालय पुणे यांची व्याख्याने मागील वर्षात आयोजित केली होती. तसेच विध्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान मिळण्यासाठी PLC & Automation या विषयावरती राष्ट्रीय पातळीची एक कार्यशाळा आयोजित केली होती.

(02) Virtual Lab:-



**शासकीय अभियांत्रिकी महाविध्यालय पुणे व MPCOE Velneshwavr यांच्यात सामंजस्य करार.**

या शाखेने आणखी एक राबवलेला उपक्रम म्हणजे Virtual Lab. बऱ्याच वेळी महाविद्यालयामध्ये काही विषयांच्या प्रयोगशाळेमध्ये पुरेसे साहित्य उपलब्ध नसते तर अशा प्रात्यक्शिकापासून मुले वन्चीत राहू नये म्हणून काही IITs आणि संलग्नित महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन अशा प्रात्यक्षिकांच्या प्रयोगशाळा Virtual Lab ह्या नावाखाली एकत्रित केलेल्या आहेत.

College of Engineering Pune, हे अशाच एका महाविद्यालयापैकी आहे. ह्या महाविद्यालायासोबत आमच्या महाविद्यालयाने वर उल्लेखिलेली संबंधित प्रात्याक्षिके करण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. ह्या करारानुसार आपण वेळणेश्वर महाविद्यालयामध्ये बसून पुण्याच्या महाविद्यालयातील उपकरणे हाताळू शकतो. आतापर्यंत आपण त्यांचा वापर कसा करावा या बाबत ०५ प्रात्याक्षिके घेतली आहेत. हि प्रात्याक्षिके विध्यार्थ्यांकरिता व शिक्षकांकरिता उपलब्ध आहेत. या प्रात्यक्षिकांसाठी कुठल्याही प्रकारचा शुल्क आकारला जात नाही. हा करार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे व महर्षी परशुराम कोलेज ऑफ इंजिनीरिंग वेळणेश्वर यांच्यात दिनांक १३/०२/२०१५ रोजी संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

**(03) GATE 2016:-**



**GATE- 2016**

अभियांत्रिकीचा सूक्ष्म अभ्यास व त्यातून उच्च अभियांत्रिकी शिक्षणास प्रोत्साहन देण्याकरता G.A.T.E. (ग्रॅजुएट ॲपटीट्युड टेस्ट इन इंगीनिअरिंग) परीक्षेची तयारी करून घेण्याचा उपक्रम राबवण्यात आला आहे. अशा परीक्षांमधून विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळते, अभियांत्रिकीचा वापर नीट उलगडतो या सर्वांतून विद्यार्थ्यांवर अभियंता म्हणून पैलू पडतात, व ते सध्याच्या चढाओढीच्या परिस्थितीत आत्मविश्वासाने अव्वल राहतात, या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यास सरकारी नोकऱ्या ONGC, HPCL, L&T, TATA, ABB, RELIANCE, INFOSYS. इत्यादी नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीस पात्र ठरतो. इन्स्ट्रुमेंटेशन विभागातर्फे ३० जुलै २०१४ पासून अविरतपणे GATE qualified शिक्षकांकडून GATE-20016 साठीचे ज्यादा वर्ग विनाशुल्क सुरु आहेत.

**(04) PLC & AUTOMATOIN WORK SHOP:-**




**अभियांत्रिकी महाविद्यालयात पी.एल.सी आणि ऑटोमेशन या राष्ट्रिय कार्यशाळेचे आयोजन.**

दिनांक १३/०२/२०१५ ते १५/०२/२०१५ या कालावधीत महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेन्टेशन विभागातर्फे PLC & Automation या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यशाळेचे उदघाटन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे येथील अधिष्ठाता डॉ. सुधीर आगाशे यांच्या शुभ हस्ते व विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १३/०२/२०१५ रोजी सकाळी १०.3० वाजता पार पडला. या कार्यशाळेसाठी विविध अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इन्स्ट्रुमेन्टेशन, मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल या शाखांतील विद्यार्थी व शिक्षकांनी नाव नोंदणी केली गेली.

अभियांत्रिकी पदवी घेतल्यानंतर विध्यार्थ्यांना ओद्योगिक क्षेत्रातील विविध विभागांमध्ये लागणा-या ऑटोमेशन प्रणालीचा अभ्यास व प्रात्यक्षिके या कार्यशाळेत घेण्यात आली.

**(05) <u>विध्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढण्यासाठी विशेष उपक्रम:-</u>**



जिल्हा

वाचनाचा संकल्प नित्यनियमाने केला जातो. मात्र 'मल्टिस्क्रीन'च्या जमान्यात प्रत्येक जण वाचन विसरला आहे. सोशल मीडियावरील मेसेज वाचतानाच डोळे दुखायला लागतात. बदलत्या परिस्थितीत ते वाचणे क्रमप्राप्त असले, तरी 'दिसामाजी वाचत जावे' हा संकल्प विचार समृद्ध करायला हातभार लावेल.

## अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी तयार केले कागद

### वेळणेश्वर महाविद्यालय : पर्यावरण वाचविण्याचा संदेश; भेटपत्रांसाठी उपयोग

सकाळ वृत्तसेवा

गुहागर, ता. २० : सतत नाविन्यपूर्ण उपक्रमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सृजनशिलता वाढविण्याचे काम करणाऱ्या वेळणेश्वर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रद्दीतील टाकावू कागदांपासून नवीन कागद बनविण्याचे काम केले आहे. या कागदाचा उपयोग भेटपत्रांसाठी सहज करता येतो. कागद वाचावा पर्यावरण वाचावा हा संदेश देण्याचे काम ह्या विद्यार्थ्यांनी केले आहे.

गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर येथील परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील इन्स्टुमेंटेशनच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी रद्दीमधील वर्तमानपत्रे, कागदाचे तुकडे हे सर्व एकत्र करून महाविद्यालयातील प्रयोगशाळेत त्याचा लगदा बनविला. त्यावर क्लोरिनेशन सारखी प्रक्रिया केली. त्यानंतर प्रक्रिया केलेला लगद्यापासून कागद बनविण्यामध्ये यश मिळविले. बनविलेला कागद संपूर्णपणे सुकल्यावर त्यावर लिहिण्याची प्रक्रिया करून त्यामध्ये अडथळा येत नाही ना, याची चाचणी घेतली. रद्दी कागदापासून नवा कागद बनविण्याची ही सर्व प्रक्रिया पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यांना डॉ. शेखर गाडगीळ यांनी मार्गदर्शन केले.

सध्या रंगसंगीत कागदांवरुन शुभेच्छापत्र देण्याऐवजी बाजारात देखील हाताने बनविलेल्या कागदाचा (हॅण्डमेड कार्ड) सर्रास वापर केला जातो. त्याचपद्धतीने प्रयोगशाळेत तयार केलेल्या या कागदाचाही वापर होऊ शकतो, हे देखील विविध शुभेच्छा पत्रे बनवून विद्यार्थ्यांनी दाखवून दिले.

**संशोधन कौशल्य वाढविण्याचा उद्देश : पवार**

या प्रयोगाबद्दल सांगताना इन्स्टुमेंटेशन विभागाचे प्रमुख अविनाश पवार म्हणाले की, कागद बनविण्यासाठी जंगलतोड करावी लागते. पण थोडे अधिक कष्ट घेतले तर नाममात्र खर्चात आपण रद्दीपासून कागद बनवू शकतो आणि पर्यावरण वाचवू शकतो हे दाखवून देण्यासाठी हा प्रयोग करण्यात आला. इन्स्टुमेंटेशनच्या विद्यार्थ्यांचे संशोधन कौशल्य वाढवावे हा देखील उद्देश प्रयोगामागे आहे.

वेळणेश्वर (ता. गुहागर) : परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत बनविलेला कागद दाखविताना विद्यार्थी.

महाविष्णू पऱ्यावरील पुलाचे काम सुरू

सकाळ वृत्तसेवा

**अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले कागद.**

सतत नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सृजनशीलता वाढविण्याचे काम करणाऱ्या वेळणेश्वर यथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रद्दीतील टाकाऊ कागदांपासून नवीन कागद बनविण्याचे काम केले आहे. या कागदाचा उपयोग भेट पत्रांसाठी सहज करता येतो. कागद वाचवा पर्यावरण वाचवा हा संदेश देण्याचे काम या विद्यार्थ्यांनी केले आहे.

गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर येथील परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेटेशनच्या तृतीय वर्ष्याच्या विद्यार्थ्यांनी राद्दीमधील वर्तमानपत्रे, कागदाचे तुकडे हे सर्व एकत्र करून महाविद्यालयातील प्रयोगशाळेत त्याचा लगदा बनविला. त्यावर क्लोरिनेशन सारखी प्रक्रिया केली त्यानंतर प्रक्रिया केलेल्या लगद्यापासून कागद बनविण्यामध्ये यश मिळविले बनविलेला कागद संपूर्ण सुकल्यावर त्यावर लिहिण्याची प्रक्रिया करून त्यामध्ये अडथला येत नाहीना, याची चाचणी घेतली. रद्दी कागदापासून नवा कागद बनविण्याची हि सर्व प्रक्रिया पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यांना डॉ. शेखर गाडगीळ यांनी मार्गदर्शन केले.

सध्या रंगसंगीत कागदांवरून शुभेच्छापत्र देण्याऐवजी बाजारात देखील हाताने बनविलेल्या कागदाचा (हंडमेड कार्ड) सर्रास वापर केला जातो त्याच पद्धतीने प्रयोगशाळेत तयार केलेल्या या कागदाचाही वापर होऊ शकतो हे देखील विविध शुभेच्छापत्रे बनवून विद्यार्थ्यांनी दाखून दिले.

**(06) डॉ. गाडगीळ सरांचे मार्गदर्शन:-**



**डॉ गाडगीळ सर मार्गदर्शन करताना.**

प्रत्येक अभियांत्रिकी महाविध्यालायामध्ये प्रत्येक सेमिस्तेर मध्ये पाहुणे म्हणून अधिव्याख्याता /प्राध्यापक विविध विषयांवर आसिका घेण्यासाठी येतात त्यांतर्गत Instrumentation विभागाला डॉ. शेखर गाडगीळ, सेवानिवृत्त विभाग प्रमुख शासकीय अभियान्त्रिकी महाविध्यालय पुणे यांच्याद्वारे या नामांकित संस्थेची पाऊले महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविध्यालायात पडली. डॉ. गाडगीळ यांनी आय.एस.ओ.आय.अंतर्गत जीवशास्त्र उपकरणीकरण सेन्सर्स अँड ट्रान्स्दुसर्स प्रोसेस इंसृमेंटेशन सी.आर.ओ. अश्या विविध पायाभूत विषयांवर व्याख्यान दिले. व्याख्यानांचा हेतू विध्यार्थ्यांचे अभियान्तिकीचे ज्ञान समृद्ध होणे व ते प्रात्यक्षिक पातळीवर सक्षम होणे हा आहे. डॉ. गाडगीळ यांचे विध्यार्थ्यांशी हे योगदान विध्यार्थ्यांच्या व शिक्षक कर्मचार्यांच्या सदैव स्मरणात राहील.

(07) **इन्स्ट्रुमेंटेशन विभागाला दिग्गजांची भेट.:-**



**भाभा ॲटोमीक रिसर्च सेंटर (BARC) च्या शास्त्रज्ञांची भेट. (5, 6, 7, & 8 April 2015).**

**BARC च्या दहा शास्त्रज्ञांच्या समूहाने विभागाला भेट देऊन विध्यार्थ्यी व शिक्षकांना मार्गदर्शन केले.**

**गेल्या दोन वर्षापासून इन्स्ट्रुमेटेशन अभियांत्रिकी विभाग मुंबई विध्यापिठाच्या परीक्षांमध्येही अव्वल आहे.**

**(08) Paper News:**

# वेळणेश्वर अभियांत्रिकी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन विभागाची शैक्षणिक भरारी

▶ गुहागर (शहर वार्ताहर)

महर्षी पर्शुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन विभागातील १५ विद्यार्थ्यांना शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे येथे उन्हाळी शिबिरात भाग घेण्याची संधी मिळाली. त्याकरीता सीओईपीची अवघड परीक्षा उत्तीर्ण करूनच त्यांना याचा लाभ घेता आला. त्यांच्या तयारीकरता एमपीसीओई मधील प्राध्यापकांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या शिबिरासाठी १५ विद्यार्थ्यांची निवड झाली.



**शिबिरात सहभागी झालेले वेळणेश्वर अभियांत्रिकी महाविद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी.**

या शिबिरात विद्यार्थ्यांनी इन्स्ट्रुमेंटेशन क्षेत्रातील विविध आधुनिक उपकरणांचा वापर आणि त्यांचा अभ्यास तज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली केला. विद्यार्थ्यांच्या मते हे शिबीर त्यांच्या अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षातील प्रोजेक्टसाठी तसेच इंटरव्ह्यूसाठी मोलाचे ठरेल. अभियांत्रिकीच्या अभ्यासाकडे बघण्याचा वेगळा दृष्टीकोन त्यांना मिळाला. या उन्हाळी शिबिरात पात्र झालेल्या १५ मुलांच्या विविध चाचण्या घेण्यात आल्या व त्यातून अंतिम ७ विद्यार्थ्यांची सीओईपी व एमएचआरडी यांच्यासोबत निवड करण्यात आली. या प्रकल्पासाठी सीओईपी कडून चांगले सहकार्य मिळाल्याबद्दल इन्स्ट्रुमेंटेशन विभागाचे प्रमुख प्रा. अविनाश पवार यांनी समाधान व्यक्त केले.

# टाकाऊ कागदापासून बनवला नवा कागद!

**गुहागर/वार्ताहर**

येथील वेळणेश्वर महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष इन्स्ट्रुमेंटेशन पदवीच्या विद्यार्थ्यांनी डॉ. शेखर गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली जुन्या व टाकाऊ कागदांपासून नवीन कोरा कागद बनवण्याचे प्रात्यक्षिक पूर्ण केले.

जुनी वर्तमानपत्रे व महाविद्यालयातील टाकाऊ कागद गोळा करून त्यावर प्रक्रिया करून विविध रंगाचे व आकाराचे नवीन कागद बनवले आहेत. तसेच त्या कागदांपासून विविध प्रकारचे शुभेच्छा पत्र या विद्यार्थ्यांनी तयार केली आहेत. या उपक्रमामागील मुख्य उद्देश अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांमधील संशोधन कौशल्य वाढवणे हा आहे. तसेच कागद वाचला तर झाडे वाचतील आणि निसर्गाचा समतोल कायम राहील व कागदापासून बनवलेल्या पिशव्या जर आपण वापरल्या तर प्लास्टिकच्या वापरावर आपोआप मर्यादा येतील आणि समुद्रकिनाऱ्यांचे व निसर्गाचे सौंदर्य टिकून राहील, असा विश्वास इन्स्ट्रुमेंटेशन विभागाचे विभाग प्रमुख प्रा. अविनाश पवार यांनी व्यक्त केली.



# अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी बनविला रद्दीपासून कागद!

## वेळणेश्वर विद्यालयातील किमया

**गिमवी : वार्ताहर**

सतत नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सृजनशिलता वाढविण्याचे काम करणाऱ्या वेळणेश्वर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रद्दीतील टाकावू कागदांपासून नवीन कागद बनविण्याची किमया साधली आहे. या कागदाचा उपयोग भेटपत्रांसाठी सहज करता येतो. 'कागद वाचवा पर्यावरण वाचवा' हा संदेश देण्याचे काम या विद्यार्थ्यांनी केले आहे.

गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर येथील परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील इन्स्ट्रूमेंटेशनच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी रद्दीमधील वर्तमानपत्रे, कागदाचे तुकडे हे सर्व एकत्र करून महाविद्यालयातील प्रयोगशाळेत त्याचा लगदा बनविला. त्यावर क्लोरिनेशन सारखी प्रक्रिया केली. यानंतर प्रक्रिया केलेल्या लगद्यापासून कागद बनविण्यामध्ये त्यांनी यश मिळविले.

बनविलेला कागद संपूर्णपणे सुकल्यावर त्यावर लिहिण्याची प्रक्रिया करून त्यामध्ये अडथळा येत नाही ना, याची चाचणी घेतली. रद्दी कागदापासून नवा कागद बनविण्याची ही सर्व प्रक्रिया पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यांना डॉ. शेखर गाडगीळ यांनी मार्गदर्शन केले.

सध्या रंगसंगीत कागदांवरुन शुभेच्छापत्र देण्याऐवजी बाजारातदेखील हातांने बनविलेल्या कागदाचा (हॅण्डमेड कार्ड) सर्रास वापर केला जातो. त्याचपद्धतीने प्रयोगशाळेत तयार केलेल्या या कागदाचाही वापर होऊ शकतो, हे देखील विविध शुभेच्छा पत्रे बनवून विद्यार्थ्यांनी दाखवून दिले.

### संशोधन कौशल्य वाढविण्याचा उद्देश : पवार

या प्रयोगाबद्दल सांगताना इन्स्ट्रूमेंटेशन विभागाचे प्रमुख अविनाश पवार म्हणाले की, कागद बनविण्यासाठी जंगलतोड करावी लागते. पण थोडे अधिक कष्ट घेतले तर नाममात्र खर्चात आपण रद्दीपासून कागद बनवू शकतो आणि पर्यावरण वाचवू शकतो हे दाखवून देण्यासाठी हा प्रयोग करण्यात आला. इन्स्ट्रूमेंटेशनच्या विद्यार्थ्यांचे संशोधन कौशल्य वाढवावे हा देखील उद्देश या प्रयोगामागे आहे.

---

ISTE
INDIAN SOCIETY FOR TECHNICAL EDUCATION

Vidya Prasarak Mandal's

## Maharshi Parshuram College of Engineering

Hedvi-Guhagar road, At: Velneshwar, Taluka: Guhagar,
Dist: Ratnagiri (Maharashtra) 415 729

INSTRUMENT SOCIETY OF INDIA
IN THE SERVICE OF THE INSTRUMENTS WORLD

A National Workshop
on

# "PLC & Automation"

Organized by

**Department of Instrumentation Engineering**

In association with

**Instrument Society of India (ISOI) Student Chapter**

**13 - 15 February 2015**